वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-शुक्रवार दि.५ डिसेंबर २०२५ पाने ४ किंमत ३

Email:- dailydivyawarta@Gmail.com

Email:-editordivyawarta@gmail.com

# दिव्य वार्ता







## नगराध्यक्ष पदाचे उमेदवार अन् प्रतिनिधींना शेवट पर्यंत थांबाव लागेल; एका फेरीत दोन प्रभागांची मतमोजणी होईल; २१ डिसेंबरला सकाळी दहा वाजता मतमोजणी सुरु होणार

# मतपेट्या स्ट्रॉंग रूममध्ये सुरक्षित; उमेदवार किंवा प्रतिनिधी पत्रव्यवहार करुन पाहणी करु शकता

## उमेदवारांना २४ तास निरीक्षणाची सुविधा : फडसे

बीड । दिव्य न्युज

नगरपरिषद निवडणुकीसाठी मतदान प्रक्रिया पार पडल्याने आता सर्व मतपेट्या कृषी उत्पन्न बाजार समिती स्ट्रॉंग रूममध्ये ठेवण्यात आल्या आहेत. स्ट्रॉंग रूम परिसरात उच्चस्तरीय सुरक्षा उपाय तैनात करण्यात आले असून १९ उमेदवारांना त्यांच्या एका प्रतिनिधीसह सतत उपस्थित राहण्याची परवानगी देण्यात आली आहे. अशी माहिती मुख्याधिकारी शैलेश फडसे यांनी नगरपरिषद कार्यालयात घेण्यात आलेल्या बैठकीत दिली आहे. नगरपरीषदेसाठी २ तारखेला मतदान प्रक्रिया पार पडली असून, कोर्टाच्या निर्देशानुसार मतमोजणी २१ डिसेंबर रोजी ठेवण्यात आली आहे. यामुळे सर्व इलेक्ट्रॉनिक मतपेट्या स्ट्रॉंग रुममध्ये ठेवण्यात आल्या आहेत. परळी येथे संशय व्यक्त करीत स्ट्रॉंग रुमसमोर राडा झाला आहे. या पोर्शभूमीवर उमेदवारांच्या मनात मतपेटी बाबतीत काही शंका निर्माण होऊ नये म्हणून बीड येथे शुक्रवारी (दि.५) नगरपरिषद कार्यालयात बैठक घेऊन बीड येथील स्ट्रॉंग रुम बाबतीत पूर्ण माहिती देण्यात आली. स्ट्रॉंग रूमच्या बाहेर आणि आतील भागात अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असून २४ तास त्याचे थेट प्रक्षेपण (लाईव्ह डिस्प्ले) उपलब्ध करून देण्यात आले आहे. त्यामुळे उमेदवारांचे प्रतिनिधी तसेच अधिकाऱ्यांना सतत निरीक्षण करणे शक्य होत आहे. या ठिकाणी एसआरपी तुकडी सह

## प्रभाग ३ ब उमेदवारांना १० तारखेपर्यंत माघार घेता येणार

प्रभाग क्र ३ मध्ये उमेवारीवर आक्षेप घेण्यात आला होता. त्याचा निकाल वेळेत न आल्याने या प्रभागाची निवडणूक पुढे ढकलण्यात आली आहे. याचे मतदान २० डिसेंबर रोजी घेण्यात येणार आहे. मतमोजणी सर्व एकत्र २१ तारखेला होणार आहे. या प्रभागात निवडणूक लढवित असलेले उमेदवार जर आपली उमेदवारी मागे घेण्याचा विचार करीत असतील तर ते दि. १० डिसेंबर दुपारी ३ वाजेपर्यंत आपला उमेदवारी अर्ज मागे घेऊ शकतात.

## असे असणार मतमोजणीचे नियोजन

बीड नगरपरिषदेसाठी २६ प्रभागात ५२ नगरसेवक पदासाठी आणि नगराध्यक्ष पदासाठी निवडणूक घेण्यात आली. २१ डिसेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. यासाठी १७ टेबल असणार असून, यावर एकावेळी दोन प्रभागांची मतमोजणी होणार आहे. सकाळी १० वाजता होईल प्रथम पोस्टल मतांची मोजणी होणार आहे. तसेच यासाठी ५ तास वेळ लागणे अपेक्षित असून दुपारी ३ वाजता पूर्ण निकाल हाती येईल, नगराध्यक्षपदाचे उमेदवार आणि त्यांचे प्रतिनिधींना शेवटपर्यंत उपस्थित राहावे लागेल अशी माहिती देण्यात आली

## उमेदवार, प्रतिनिधींसाठी व्यवस्था

स्ट्रॉंग रुमच्या जवळ उमेदवार आणि त्यांनी सुचविलेल्या प्रतिनिधींना बसण्यासाठी कक्ष तयार करण्यात आला आहे. येथे सीसीटीव्हीचे लाईव्ह येथे स्क्रीनवर दिसणार आहे. यामुळे येथे उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी २४ तास बसून निरिक्षण करु शकतात.

# रीलस्टार तरुणी सराईत चोर, पोलिसांनी ठोकल्या बेड्या

## प्रियकरासह तिच्यावर ११ गुन्हे दाखल



### सुपा आणि शिरूर कासार येथे गुन्हे

■ तपासात समोर आले की, कोमल काळे आणि सुजित चौधरी यांची जोडी सराईत गुन्हेगार आहे. त्यांनी कबुली दिली आहे. कोमल काळे हिच्यावर यापूर्वी शेवगा, सुपा आणि शिरूर कासार येथे गुन्हे दाखल असून, सुजित चौधरी यांच्यावर दरोडा, जबरी चोरी असे गंभीर गुन्हे आधीपासून नोंदलेले आहेत.

बीड । दिव्य न्युज

सोशल मीडियावर रील्स बनवून लोकप्रिय असलेली आणि पन्नास हजाराहून अधिक फॉलोवर्स असलेली एक तरुणी प्रत्यक्षात सराईत गुन्हेगार असल्याचे समोर आले आहे. एसटी बसमधील सहप्रवासी महिलांना लुटणाऱ्या या रील स्टार तरुणीला आणि तिच्या प्रियकराला अहिल्यानगर पोलिस ठाण्याच्या गुन्हे शाखेने बेड्या ठोकल्या आहेत.

गुन्हेगारांची नावे आहेत - कोमल नागनाथ काळे (वय १९) आणि तिचा प्रियकर सुजित राजेंद्र चौधरी (वय २५). त्यांच्याकडून सोन्याचे दागिने आणि महागडे मोबाइल असा तब्बल ९ लाख ३५ हजार ३२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच, कोमल काळे हिच्यावर बीड जिल्ह्यातील शिरूर कासार येथेही गुन्हा दाखल आहे. हा प्रकार ता. १९ नोव्हेंबर रोजी घडला. अलका मुकुंद पालवे पाथर्डी ते कल्याण एसटीबस प्रवास करत होत्या. प्रवासादरम्यान एका अनोळखी तरुणीने त्यांच्याकडील सोन्याचे दागिने आणि रोकड लंपास केली. पोलिसांनी कोमल काळे यांची चौकशी केली असता, तिने सोन्याचे दागिने आपल्या प्रियकर सुजित चौधरी याच्याकडे दिले असल्याची कबुली दिली.

## दहावी-बारावी प्रमाणपत्रासाठी हेलपाटे थांबणार




बीड । दिव्य न्युज

दहावी-बारावीच्या डुप्लिकेट मार्कशीट, प्रमाणपत्र, माइग्रेशन सर्टिफिकेट यांसाठी लागणारी धावपळ आता इतिहासजमा होणार आहे. राज्य शिक्षण मंडळाने ही संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन केल्यानं विद्यार्थ्यांना घरबसल्या प्रमाणपत्रे मिळणार असून सही-शिक्के, हेलपाटे यांचा त्रास पूर्णत: थांबणार आहे.

एकसमान शुल्क राबवण्यात आले असून डुप्लिकेट कागदपत्रांसाठी ३०० ते ५०० रुपयांपर्यंत खर्च अपेक्षित आहे. डुप्लिकेट मार्कशीट, माइग्रेशन, नामांतरण, जन्मतारीख सुधारणा यांसाठी आता शिक्षण मंडळाच्या अधिकृत पोर्टलवरून अर्ज करता येईल.

# मतमोजणी २१ डिसेंबरलाच होणार

## उच्च न्यायालयाच्या निकालावर सर्वोच्च न्यायालयाचेही शिक्कामोर्तब

दिल्ली, (वृत्तसंस्था):-

राज्यातील नगरपालिका आणि नगरपंचायतीसाठी २ डिसेंबर रोजी मतदान झाले. मात्र ही मतदान प्रक्रिया राबवली जात असताना अंतिम दोन दिवसांमध्ये राज्यातील काही नगरपालिकांचे मतदान लांबणीवर टाकत ते २० डिसेंबर रोजी तसेच त्यांची मतमोजणी २१ डिसेंबर रोजी होणार असल्याचा निर्णय घेतला गेला. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या आदेशानंतर सर्वच निवडणुकांची मतमोजणी लांबणीवर पडली. या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. आज या प्रकरणाची सुनावणी झाली असताना सर्वोच्च न्यायालयाने मतमोजणी २१ डिसेंबराच होणार असल्याचे सांगितले आहे. सरन्यायाधीश सूर्य कांत व न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठासमोर मतमोजमीच्या विषयासंदर्भात सुनावणी पार पाडली. यावेळी खंडपीठाने निवडणुकांचा जो कालावधी निश्चित केला आहे. त्याच्या आत म्हणजेच ३१ जानेवारीपूर्वी निवडणूक प्रक्रिया पूर्ण करावी, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत.



कोणत्याही कारणास्तव निवडणुका पुढे ढकलण्याचा प्रयत्न होऊ नये, असेही खंडपीठाने सांगितले. सर्वोच्च न्यायालयाने सर्व पक्षकारांची बाजू ऐकून घेतल्यानंतर आपला निकाल दिला. २० डिसेंबर रोजी होणाऱ्या निवडणुका काही कारणास्तव जर पुढे ढकलल्या गेल्या तर पुन्हा निवडणुकीची प्रक्रिया पुढे ढकलली जाऊ शकते. मात्र तरीही २१ डिसेंबर रोजी २ डिसेंबरला झालेल्या निवडणुकांचा निकाल जाहीर केला जावा. तसेच उच्च न्यायालयात ज्या याचिका प्रलंबित आहेत, त्यांचा कुठलाही व्यत्यय निवडणूक कार्यक्रमात येता कामा नये, असेही सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने सांगितले. राज्यातील सर्व २८८ नगरपालिका व नगरपंचायतींची मतमोजणी २१ डिसेंबर रोजी करण्याचा आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने २ डिसेंबरला दिला होता. यापूर्वी मतमोजणी ३ डिसेंबरला होणार होती.

## बीडमध्ये अठरा टेबलवर होणार मतमोजणी!

बीड, :- बीड नगर परिषदेच्या नगराध्यक्ष आणि ५२ नगरसेवक पदासाठी झालेल्या मतदानाची मतमोजणी २१ डिसेंबर रोजी कृषी उत्पन्न बाजार समिती मध्ये होणार आहे. एकूण अठरा टेबलवर मतमोजणी होईल, तेरा राउंड होतील अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी कविता जाधव यांनी दिली. बीड नगर परिषदेच्या सभागृहात आयोजित बैठकीत त्यांनी माहिती दिली. बीड नगराध्यक्ष पदासाठी आणि ५१ नगरसेवक पदासाठी २ डिसेंबर रोजी मतदान झाले. प्रभाग क्र ३ ब चे मतदान २० डिसेंबर रोजी होणार आहे.त्यानंतर २१ डिसेंबर रोजी सकाळी दहा वाजेपासून मतमोजणी सुरु होईल. सुरवातीला पोस्टल मतमोजणी केली जाईल, त्यानंतर १८ टेबलवर प्रत्येकी दोन प्रभागाची मतमोजणी व नगराध्यक्ष पदासाठी मोजणी होईल.

# राज्यभरात शिक्षकांचं मोठं आंदोलन; राज्यातील ६० हजार शाळा बंद

## तोडगा न निघाल्यास हिवाळी अधिवेशनात धरणे आंदोलनाचा इशारा

पुणे । दिव्य न्युज

टीईटी परीक्षेच्या विरोधात आज संपूर्ण राज्यभर शिक्षक रस्त्यावर उतरले आहेत. टीईटी सक्ती आणि १५ मार्च २०२४ संच मान्यतेच्या जीआरच्या विरोधात राज्यातील शिक्षक शाळा बंद आंदोलनात सहभागी होत आहेत. मुंबईतील २०० ते ३०० च्या जवळपास मुख्यत्वे खाजगी अनुदानित शाळा बंद राहणार असल्याचा शिक्षक संघटनांचा दावा आहे. राज्यभरातील जवळपास दीड हजार शाळा या बंद राहतील अशी माहिती आहे त्यामध्ये काही विनाअनुदानित आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळेत सुद्धा समावेश असल्याची माहिती शिक्षक संघटनांनी दिली आहे. टीईटी सक्तीमुळे शिक्षकांमध्ये



भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. ५३ पेक्षा कमी वय असणाऱ्या सर्व शिक्षकांना टीईटी परीक्षा देण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाने सक्ती केली आहे.

यावर राज्य सरकारने पुनर्विचार याचिका दाखल करावी व आपली भूमिका मांडावी अशी मागणी शिक्षक संघटनांची आहे. त्यासोबतच शैक्षणिक वर्षाच्या मध्यावधीत संचमान्यतेचे अन्यायकारक निकष लावून हजारो शिक्षकांना अतिरिक्त ठरवले जात आहे. विषयाला शिक्षक उरणार नाही. अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन झाल्याने शाळांचे संपूर्ण नियोजन कोलमडणार आहे. अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनाच्या प्रक्रियेला स्थगिती देण्याची मागणी सर्व संघटनांनी केलेली आहे. या सगळ्याच्या विरोधात आज शाळा बंद आंदोलन शिक्षकांनी पुकारला आहे. यामध्ये प्रामुख्याने खाजगी अनुदानित शाळांमधील शिक्षकांनी शाळा बंद आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये काही प्रमाणात विनाअनुदानित आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांचा सुद्धा समावेश आहे.

# जन्मठेप भोगून आल्यानंतर षड्यंत्र करुन केला हल्ला

## पंडित यांचा आरोप; सीसीटीव्ही फुटेज सुपूर्द

बीड । दिव्य न्युज

गेवराईच्या कृष्णाई कार्यालयावर त्रिंबक पवारने हल्ला केला. त्याचे सीसीटीव्ही फुटेज पंडित यांनी पोलिस अधीक्षकांना दिले. १९९७साली खून प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा भोगून बाहेर आल्यानंतर आता षड्यंत्र करुन हल्ला केल्याचा आरोप आमदार विजयसिंह पंडित यांनी गुरुवारी (ता. चार) पत्रकार परिषदेत केला.

गेवराईतील हल्ला प्रकरणाचे सीसीटीव्ही फुटेज व लेखी तक्रार आज राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित व विजयसिंह पंडित यांनी पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांची भेट घेऊन त्यांना दिले. यानंतर पंडित यांनी माध्यमांशी संवाद साधला. पंडित म्हणाले, मतदानाच्या चार दिवस आधी जेलमधील लोक आणून पूर्वनियोजित प्रकार केला. मारताना म्हणत होता अमर पंडितांना आज संपविल्याशिवाय जायचं नाही. मात्र, अमरसिंह पंडित बूथवर गेलेले होते म्हणून त्यांचा जीव वाचला. लोकप्रतिनिधीला मारण्याचं कटकारस्थान होतंय तर सामान्यांचं काय? असेही पंडित म्हणाले. दरम्यान, या हल्लुयात जखमी अमृत डावकर यांचा रात्री उशिरा पोलिसांनी जबाब नोंदवून घेतला. मंगळवारी गेवराईत बुथवर कुरुबुरीनंतर त्रिंबक उर्फ बाळराजे पवार अमरसिंह पंडित यांच्या कृष्णाई निवासस्थानी घोळक्यासह दाखल झाले. त्यांनी डावकर यांना बेल्ट, काठ्या, दांडक्यांनी जबर मारहाण केली. त्यानंतर जयसिंग पंडित व पृथवीराज पंडित हे देखील माजी आमदार लक्ष्मण पवार यांच्या निवासस्थानावर चालून गेले. प्रकरणी गेवराई ठाण्यात ५५ लोकांवर गुन्हा नोंद करण्यात



**बीड : पोलिस अधीक्षकांना भेटून बाहेर येताना अमरसिंह पंडित व विजयसिंह पंडित.**

# नेकनूरच्या बाजार तळावरच टाकला जातोय गावचा कचरा





नेकनूर/दिव्य न्युज

स्वच्छ आणि सुंदर गाव ही केवळ घोषणाच राहिली असून, नेकनूर ग्रामपंचायतीच्या गलथान कारभाराचा आणखी एक किळसवाणा नमुना समोर आला आहे. ज्या ठिकाणी नागरिक आपली दैनंदिन खरेदी करण्यासाठी येतात, त्याच बाजाराच्या मध्यभागी ग्रामपंचायतीने संपूर्ण गावातील कचरा आणून टाकला असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

नेकनूर ग्रामपंचायतीचा कचरा वाहतूक करणारा ट्रॅक्टर (ट्रॉलीसह) हा गावातील गोळा केलेला सर्व कचरा थेट बाजारपेठेच्या परिसरात खाली करत आहे. कचरा फेकण्याच्या या प्रकारामुळे ग्रामपंचायतीने स्वच्छता आणि नागरिकांच्या आरोग्याच्या नियमांना अक्षरशः पायदळी तुडवले आहे. नागरिकांचे आरोग्य धोक्यात: बाजाराच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात कचरा टाकल्यामुळे परिसरात लगेच दुर्गंधी पसरली आहे. यामुळे बाजारात येणाऱ्या नागरिकांचे तसेच आजूबाजूच्या दुकानदारांचे आरोग्य धोक्यात आले आहे. कचरा डेपो किंवा कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी योग्य जागा उपलब्ध असताना, ग्रामपंचायतीने लोकांच्या वर्दळीच्या ठिकाणी कचरा का टाकला? यावरून ग्रामपंचायत प्रशासनाची कार्यक्षमता आणि निर्णयक्षमता यावर मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. या लाजिरवाण्या कृत्यामुळे ग्रामस्थांमध्ये आणि व्यापाऱ्यांमध्ये तीव्र संतापाची भावना आहे.

ग्रामपंचायतीनेच जर असे कृत्य केले, तर सामान्य लोकांनी स्वच्छतेचे नियम कोणाकडून शिकायचे?, असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत. काही महिन्यांपूर्वी, गावातील स्वच्छतेकडे दुर्लक्ष केल्याबद्दल संतप्त गावकऱ्यांनी ग्रामपंचायत कार्यालयातच कचरा आणून टाकत आपला रोष व्यक्त केला होता. मात्र, त्या घटनेतूनही ग्रामपंचायतीने कोणताही धडा घेतला नसल्याचे आजच्या कृत्यावरून स्पष्ट होते. ग्रामसेवकांनी व सरपंचांनी या गंभीर प्रकाराची तातडीने दखल घेऊन, बाजारातील कचरा त्वरित हटवून संबंधितांवर योग्य कारवाई करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

# नगरपालिकेत कोण ठरणार बाजीगर

## मतांचा टक्का घसरला ; सामाजिक समीकरणांनी गणितांची जुळवाजुळव



**बीड । दिव्य न्युज**

**मराठवाड्यातील सर्वांत मोठ्या बीड नगरपालिकेसाठी मंगळवारी (ता. दोन) मतदान पार पडले. जिल्ह्यातील इतर नगरपालिकांच्या तुलनेत बीडचा मतांचा टक्का मोठ्या प्रमाणावर घसरला आहे. मतमोजणीची लांबली असली तरी राजकीय नेते सामाजिक व जातीय समीकरणांवरून आपल्या पक्षाच्या विजयाचे गणित जुळवणाऱ्या आकड्यांची मांडणी करत आहेत. निवडणुकीत 'जिंकण्यासाठी वाट्टेल ते' भूमिका सर्वच राजकीय पक्षांनी घेतली. या निवडणूक निकालात 'बाजीगर' कोण ठरणार आणि धक्का कोणाला बसणार हे कळायला मात्र अवधी आहे.**

**नगराध्यक्षपदासाठी आखाड्यात १९ उमेदवार असले तरी खरी लढत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या स्मिता वाघमारे, भाजपच्या डॉ. ज्योती घुंबरे, राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रेमलता पारवे यांच्यात झाली, एमआयमच्या उमेदवाराची चर्चा झाली, पण मत विभाजनाच्या गणितावरूनच. नगराध्यक्षपदासह ५२ ऐवजी ५१ नगरसेवकांसाठी मंगळवारी मतदान पार पडले.**

मराठवाड्यातील सर्वांत मोठ्या बीड नगरपालिकेसाठी उपमुख्यमंत्री तथा पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांनीही जोर लावला. तर, राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनीही बीडवर लक्ष घातले. शेवटच्या टप्प्यात खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून स्मिता वाघमारे उमेदवार आहेत. त्यांचे पती विष्णू वाघमारे २० वर्षे नगरसेवक तसेच सभापती तर स्वतः स्मिता वाघमारे १० वर्षे नगरसेवक आणि सभापती राहिलेल्या आहेत. तर राष्ट्रवादी काँग्रेसकडून प्रेमलता पारवे उमेदवार आहेत. त्या स्वतः महसूल अधिकारी असून वडील दलितमित्र होते. तर, भाजपकडून बधीरीकरण तज्ज्ञ डॉ. ज्योती मुंबरे उमेदवार आहेत. त्यांच्या माध्यमातून भाजपने हिंदू प्रयोग केला. निवडणुकीतील उमेदवारी दाखल करण्याच्या प्रक्रियेदरम्यानच सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये बेबनाव झाला. यामुळे आमदार विजयसिंह पंडित यांना बीडमध्ये लक्ष घालावे लागले. तसे पंडित पवार ५० वर्षांपासून बीड शहराच्या राजकारण, समाजकारणात सक्रिय आहे.

### गणितेही सामाजिक समीकरणांनीच

अनुसूचित जाती महिलेसाठी नगराध्यक्षपद राखीव असलेल्या बीडमध्ये सर्वच पक्षांनी सामाजिक गणिते मांडूनच उमेदवार दिले. आता निकालाचे गणित जुळवितानाही कोणत्या वॉर्डमध्ये कोणत्या समाजाची किती मते व एकूण झालेली मते याचे आकडे समोर ठेवून आपल्याच पक्षाचा नगराध्यक्ष कसा जिंकणार याची गणिते मांडली जात आहेत.

यांनीही सभा घेतली. वरिष्ठ नेत्यांचे लक्ष लागले असले तरी स्थानिक पातळीवर आमदार संदीप क्षीरसागर, आमदार विजयसिंह पंडित आणि डॉ. योगेश क्षीरसागर यांच्यासाठी या निवडणुकीचा निकाल नवी राजकीय दिशा ठरविणारा आहे.

मात्र, यावेळी प्रथमच त्यांनी थेट नेतृत्व केले. या जुळवाजुळवीत त्यांना माजी आमदार संजय दौंड, जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, युवक जिल्हाध्यक्ष बळिराम गवते यांनीही साथ दिली. एक सत्तापक्ष सोडला असला तरी डॉ. योगेश क्षीरसागर यांनाही भाजपसारखा दुसरा सत्तापक्ष भेटला आणि पक्षाला बीडमध्ये राजकीय नाव असलेले स्थानिक नेतृत्व भेटले. त्यामुळे त्यांच्यासह पत्नी डॉ. सारिका क्षीरसागर यांनीही भाजपसाठी प्रतिष्ठा पणाला लावली आहे. त्यांच्या साथीला काका जयदत्त क्षीरसागर यांनीही मैदानात उडी मारली. तर, मागच्या नऊ वर्षांपासून स्वबळावर जिल्हा परिषद, नगर परिषद आणि विधानसभेत राजकीय मातब्बर काकांना आव्हान देत यश गाठल्याने संदीप क्षीरसागर यांचाही कॉन्फिडन्स अधिकचा दिसला. त्यांच्या साथीला माजी आमदार सय्यद सलीम यांचे नियोजन दिसले. दरम्यान, प्रमुख पक्ष आणि नेत्यांच्या सगळ्या खेळ्यानंतर मते पदरात पाडून घेण्यासह मतदारांत संभ्रम करून समोरच्या उमेदवारांची मतविभागणी करण्याचे कौशल्य पार पाडून मतदानही पार पडले. एकूणच आता जय-पराजय जरी स्मिता वाघमारे, डॉ. ज्योती घुंबरे वा प्रेमलता पारवे यांचा झाला तरी त्याचे क्रेडिट आणि अपयशाचे खापर मात्र नेतृत्व करणाऱ्या संदीप क्षीरसागर, विजयसिंह पंडित आणि डॉ. योगेश क्षीरसागर यांनाच असेल.

# जागतिक एड्स पंधरवड्यानिमित्त धारूर येथे बांधकाम कामगारांची मोफत आरोग्य तपासणी

धारूर । दिव्य न्युज

जागतिक एड्स पंधरवड्यानिमित्त धारूर शहरात बांधकाम क्षेत्रातील कामगारांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. ग्रामीण रुग्णालय धारूर येथील एकात्मिक सल्ला व चाचणी केंद्र (खउढउ) यांच्या सहाय्याने आयोजित या शिबिरात कामगारांची एचआयव्ही तपासणीसह केएफटी, एलएफटी, सीबीसी आणि शुगर तपासणी करण्यात आली. बांधकाम कामगारांच्या सर्वांगीण आरोग्य संरक्षण आणि एड्सविषयी जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य हेतू होता.




शिबिराचे आयोजन बांधकाम कामगार संघटनेचे तालुकाध्यक्ष सलाम काझी आणि शहराध्यक्ष सादिक भाई यांच्या पुढाकारातून करण्यात आले. बांधकाम क्षेत्रात काम करणारे बहुतेक कामगार रोजंदारीवर काम करतात, त्यामुळे वेळेअभावी त्यांना आरोग्य तपासणीची संधी मिळत नाही. अशा वेळी जागतिक एड्स पंधरवड्याच्या पार्श्वभूमीवर हे आरोग्य शिबिर महत्त्वपूर्ण ठरले. ग्रामीण रुग्णालयातील तज्ञ डॉक्टर व आरोग्य कर्मचारी यांनी कामगारांना एचआयव्हीचा प्रसार, प्रतिबंध, तपासणीचे फायदे आणि एड्स संबंधित सरकारी योजना यांची माहिती दिली. तपासणीसोबतच योग्य सल्लामसलत करून आरोग्यदायी जीवनशैली अवलंबण्याचे आवाहन करण्यात आले. कामगारांनीही या तपासणी शिबिराला चांगला प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. कार्यक्रमादरम्यान बांधकाम कामगारांना स्वच्छता, सुरक्षित लैंगिक आचरण, रक्तदात्यांची काळजी, सुई व उपकरणांचा सुरक्षित वापर, पौष्टिक आहाराचे महत्त्व आणि नशामुक्त जीवन याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. शिवाय, एचआयव्हीसाठी उपलब्ध मोफत तपासणी व औषधोपचार केंद्रांची माहिती देऊन नियमित आरोग्य तपासणी करण्यास प्रोत्साहित केले. तालुकाध्यक्ष सलाम काझी यांनी सांगितले की, बांधकाम क्षेत्रातील कामगारांचे आरोग्य मजबूत असेल तरच त्यांच्या कुटुंबाचा आर्थिक पायाही मजबूत राहतो. त्यामुळे पुढील काळातही अशा प्रकारची आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित केली जातील. तर शहराध्यक्ष सादिक भाई यांनी ग्रामीण रुग्णालयाच्या टीमचे विशेष आभार मानले.या शिबिरामुळे बांधकाम कामगारांमध्ये एड्सविषयी भीतीपेक्षा माहिती वाढली आणि तपासणीबाबत सकारात्मक दृष्टीकोन तयार झाला. जागतिक एड्स पंधरवड्यात धारूर तालुक्यात झालेली ही उपक्रमशीलता आरोग्य क्षेत्रातील एक महत्त्वपूर्ण पाऊल मानली जात आहे. ग्रामीण भागात एड्स प्रतिबंधासाठी अशा जनजागृती कार्यक्रमांची नितांत आवश्यकता असल्याचे स्थानिक आरोग्य तज्ज्ञांनी नमूद केले.

# माजी नगरसेविका सौ.गयाबाई लक्ष्मणराव आळणे यांचे दुख:द निधन


## आळणे परिवाराचा मानवतेचा संदेश-मरणोत्तर अवयवदानाने दिला जीवनदानाचा दिव्य प्रकाश

वडवणी । दिव्य न्युज

बीड जिल्ह्याच्या वैद्यकीय, सामाजिक व राजकीय क्षेत्रात आदराचे स्थान असलेल्या माजी नगरसेविका सौ. गयाबाई लक्ष्मण आळणे (वय-) यांचे पुणे येथील रुबी हॉस्पिटलमध्ये अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. आळणे कुटुंबातील ज्येष्ठ आणि सर्वांच्या प्रेमाचा आधारस्तंभ असलेल्या गयाबाई यांच्या निधनाने वडवणी परिसरात शोककळा पसरली आहे.



डॉ. सिताराम आळणे व डॉ. केशव आळणे यांच्या मातोश्री तसेच स्व. लक्ष्मणराव आळणे यांच्या पत्नी असलेल्या सौ. गयाबाई आळणे या धार्मिक, मूल्यनिष्ठ आणि परोपकारी वृत्तीच्या म्हणून ओळखल्या जात. आयुष्यभर समाजसेवेची मशाल पेटवून ठेवणाऱ्या या थोर व्यक्तिमत्त्वाने निघून जातानादेखील मानवतेची सर्वोच्च सेवा करत मरणोत्तर अवयवदानाचा अमूल्य निर्णय घेतला. आळणे परिवाराच्या संमतीने रुबी हॉल क्लिनिक, पुणे येथे अवयवदान प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. या उदात्त कार्याबद्दल रुग्णालयाच्या तर्फे गयाबाई आळणे यांना 'गार्ड ऑफ ऑनर' देऊन सन्मानपूर्वक मानवंदना देण्यात आली-जी त्यांच्या मानवसेवेची सर्वोच्च ओळख ठरली. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना व नातवंडे असा परिवार



आहे. अंत्यसंस्कार / दिनांक : ०६/१२/२०२५, शनिवार / वेळ : सकाळी ८.३० वाजता / स्थळ : राहत्या घरापासून मिरवणूक निघून वडवणी येथील वैकुंठधाम येथे अंतिम संस्कार. या अत्यंत दुःखद प्रसंगी आळणे परिवाराच्या दुःखात आम्ही मनःपूर्वक सहभागी आहोत. ईश्वर त्यांच्या पवित्र आत्म्यास चिरशांती लाभो परिवाराला धैर्य, सामर्थ्य मिळो हीच प्रार्थना.

# चकलांबा येथे मदरसा जामियातु सॉलीहात येथे एक दिवसीय खानकाही इज्तेमा

## हजरत मौलाना इनायतुल्ला सहाब इखरवि यांची प्रमुख उपस्थिती



चकलांबा । दिव्य न्युज

(सय्यद गफ्फार)- गेवराई तालुक्यातील चकलांबा येथे मुलींची अरबी मदरसा (उर्दु शाळा) बऱ्याच वर्षापासून प्रसिद्ध आहे. मदरसा चे संचालक मुफ्ती कौसर सहाब हे दर वर्षी बयान चा कार्यक्रम ठेवत असतात.लोकांना नमाज, रोजा,जकात,हज आणि सदका तसेच, ईश्वरची प्रार्थना करणे या बद्दल माहिती तसेच,मानवतेचा संदेश लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी बयानचा कार्यक्रम असतो. त्याचप्रमाणे यावर्षी दि.६ डिसेंबर शनिवार रोजी एक दिवशी रोजा खानकाहि इस्तेमा चकलांबा येथे गुजरातहुन हजरत मौलाना इनायतुल्ला सहाब इखरवि दामत बरका तुहुम, मोना पार्क भरूच गुजरात यांचा बयानचा कार्यक्रम होणार आहे.तसेच, अजिमुश्शान मुसाबका ६ डिसेंबर शनिवार रोजी सकाळी ११वाजता मुलींचा नातखाणी कार्यक्रम महिलांसाठीही ठेवण्यात आलेला आहे. तसेच,महिलांसाठी व्यवस्था करण्यात आलेली आहे.तरी मुफ्ती कौसर सहाब यांनी सर्वांना जास्तीत जास्त उपस्थित राहण्याचे आव्हान केले आहे.

# मराठी पत्रकार परिषदेच्या वर्धापन दिनानिमित्त पाटोदा पत्रकारांची आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

पाटोदा / दिव्य न्युज

मराठी पत्रकार परिषदेच्या वर्धापन दिनानिमित्त पाटोदा तालुका पत्रकार परिषदेतर्फे ग्रामीण रुग्णालय, पाटोदा येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. तालुक्यातील विविध माध्यमांतील पत्रकारांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत हृदयविकार तपासणी, रक्तदाब, साखर, हिमोग्लोबिन यांसह विविध आरोग्य तपासण्या करून घेतल्या.

ग्रामीण रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. अभिषेक जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचारी यांनी तपासण्या करून आवश्यक सल्ला दिला. बदलती जीवनशैली, ताणतणावाचे व्यवस्थापन आणि नियमित आरोग्य तपासणीचे महत्त्व याबाबतही डॉक्टरांनी मार्गदर्शन केले. पत्रकार आपल्या कामाच्या धावपळीत आरोग्याकडे दुर्लक्ष करतात,



अशा उपक्रमामुळे योग्य आरोग्य जागरूकता निर्माण होते, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

शिबिराच्या यशस्वीतेसाठी डॉ. खाडे, डॉ. तागड, डॉ. ओमासे मॅडम, डॉ. सबिया मॅडम, भागवत गर्जे, परिचारिका, चौले (बडे) मॅडम, डोरले मॅडम ,बांगर,सानप,राख, ससाणे मामा, तात्या नागथाई तसेच ग्रामीण रुग्णालयातील सर्व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास मराठी पत्रकार परिषदेचे जेष्ठ पत्रकार छगन मुळे, जिल्हा उपाध्यक्ष कादर मकराणी, इद्रीस चाऊस, दयानंद सोनवणे, श्रीरंग लांडगे, सचिन पवार, डिगंबर नाईकनवरे, तालुकाध्यक्ष अजय जोशी, सचिव हमीदखान पठाण, हल्ला कृती समितीचे तालुकाध्यक्ष संजय सानप, उपाध्यक्ष जावेद शेख,अशोक भवर,अनिल गायकवाड, शहराध्यक्ष सय्यद फय्याज, सलीम शेख, पवन भोकरे, सय्यद इम्रान, डिजिटल मीडिया उपाध्यक्ष डॉ. हरिदास शेलार, दत्ता देशमाने यांसह अनेक पत्रकार बांधव उपस्थित होते. उपक्रमाला मिळालेल्या प्रतिसादामुळे पुढील काळात अशा उपयुक्त उपक्रमांचे आयोजन करण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला.

# वडवणी शहरांत बीड जिल्यातील नगरपालिका विजयाच्या रंगू लागल्या चर्चा

## सोळा दिवस प्रशासनाला मतदान यंत्र सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी बाढल्याने प्रशासनाची डोकेदुखी

**लांबलेल्या निर्णयामुळे उमेदवारांचा जीव टांगणीला**

वडवणी । दिव्य न्युज (शेख शरीफ)

नगरपालिकेच्या नगराध्यक्ष व नगरसेवकांसाठी २ डिसेंबरला मतदान झाले. दुसऱ्याच दिवशी ३ डिसेंबरला निकाल लागणार यासाठी प्रशासनाने उमेदवारांनी सर्व तयारी पूर्ण केली होती. परंतु, न्यायालयाच्या निर्णयामुळे मतमोजणी पुढे ढकलण्यात आली. सर्च यंत्रणा वाया गेली असून, उमेदवारांचा जीव टांगणीला लागला. दरम्यान, निकाल लांबल्याने वडवणी शहरात चौका चौकात चहा टपरीवर विजयाच्या चर्चा रंगू लागल्या आहेत. निवडणूक आयोगाने का निर्णय बदलला असेल, निकाल तत्काळ झाला असता म्हणजे उमेदवारांच्या जीवाला घोर लागला नसता,



लांबलेल्या निर्णयामुळे उमेदवारांचा जीव टांगणीला लागला आहे. निवडणुकीत मतदाराला देव मानून योग्य प्रकारे विचारपूस होत असते. तर मतदाराला निवडणुकीवेळी दोन्ही बाजूंकडून 'लक्ष्मीदर्शन' केले जाते. दरम्यान, शहराच्या मतदार यादीत आपले नाव असावे, असे ग्रामीण भागातील नागरिकांकडून बोलले जात आहे.

मशीनमध्ये काही गडबड तर होणार नाही ना या विचाराने उमेदवार हैराण होऊन गेले आहेत. तर पुढील १८ दिवस प्रशासनाला मतदान यंत्र सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी बाढल्याने प्रशासनाची डोकेदुखी सुरू झाली आहे. बीड जिल्ह्यातील बीड, माजळगाव, धारूर, अंबाजोगाई, परळी, गेवाराई नगरपालिकेची निवडणूक उमेदवारांनी बारेमाफ खर्च करून चुरशीने लढली आहे. बीड जिल्ह्यातील भाजप, एम आय एम, तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रमुख नेत्यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. प्रचारात बाहून घेतलेल्या कार्यकर्त्यांच्या मनाची द्विधा अवस्था झाली असून एकदा मतमोजणी होऊन या तणावातून बाहेर पडण्याची खरे तर या सर्वांची मनःस्थिती होती. परंतु आत्ता मतमोजणी लांचल्याने तणावात भरच पडली आहे. आणखी पधरा दिवस हा ताण मतदार तसेच कार्यकर्त्यांना सहन करावा लागणार आहे. २१डिसेंबरला सकाळी मतमोजणी होणार आहे. तोपर्यंत उमेदवारांची धडपड चागलीच वाढणार आहे. स्वतःच्या प्रभागात नेमक्या किती मतांची भर पडली असेल, कोणल्या बूथवर समर्थकांनी किती मतदान केले असेल याच्या चर्चाना रंगत आली आहे. 'पैसा बोलता है मा गाण्याप्रमाचे अक्षरशः जिल्ह्यात पैशांनी घुमाकुळ घातला. मात्र पुढील येवू घातलेल्या पंचायत समिती, जिल्हा परिषद निवडणुकीत हाच पैटर्न चालणार का? चालणार असेल तर उमेदवाराने कोठून आणायचे एवढे पैसे, अशा चर्चाना उधाण आले आहे




# जपून जा, येथे धोका आहे!

## बीड ते तुळजापूर रस्त्यावरील 'हॉस्पॉट' : वाहतुकीच्या दृष्टीने काही ठिकाणी धोकादायक

### लूटमारीच्या वाढत्या घटना, पोलिसांचे निर्देश



बीड । दिव्य न्युज

सोलापूर धुळे राष्ट्रीय महामार्ग ५२ वरील बीड ते तुळजापूरदरम्यान प्रवास करणाऱ्या वाहनचालकांसाठी धाराशिव, बीड जिल्हा पोलिस आणि महामार्ग सुरक्षा पथकाकडून सोमवारी (ता. एक) महत्त्वाच्या सूचना करण्यात आल्या आहेत.

सोलापूर-धुळे महामार्गावरील धोकादायक ठिकाणी चोरी, लूटमार आणि दरोड्याच्या घटना वाढल्याने सतर्कता बाळगणे गरजेचे आहे. अशा घटनांचा आढावा घेतला असता वाहतुकीच्या दृष्टीने काही ठिकाणे हॉटस्पॉट, धोकादायक म्हणून घोषित करण्यात आली आहेत. तसेच सोशल मीडियावर असे मॅसेज करून ते इतर ग्रुपवर शेअर करण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे. राष्ट्रीय महामार्ग क्र. ५२ सोलापूर-धुळे महामार्गावरील बीड ते तुळजापूर १३० किलोमीटरच्या रस्त्यात वाहनलुटीचे अनेक प्रकार घडल्याने अशी धोकादायक दहा ठिकाणे (Hotspots) घोषित करण्यात आली आहेत. वाहनचालकांनी या ठिकाणी विशेष काळजी घ्यावी, असे आवाहन जिल्हा वाहतूक पोलिस शाखेने केले आहे.

### अतिधोकादायक : येडशी बायपासपासून तुळजापूर पोलिस मदत आणि संपर्क क्रमांक

पोलिस प्रशासनाने सुरक्षेसाठी गस्ती पथके (७ वाहने) तैनात केली आहेत. तसेच आपत्कालीन परिस्थितीत खालील क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तत्काळ मदतीसाठी डायल ११२, तसेच वाशीचे पोलिस निरीक्षक शंकर शिंदे (९३५५१००१००), नेकनूरचे सहायक पोलिस निरीक्षक गोसावी (९००९००८०१०), येरमाळ्याचे सहायक पोलिस निरीक्षक भालेराव (९४०५३३५३३३), महामार्ग सुरक्षाचे सहायक पोलिस निरीक्षक निशिकांत शिंदे (९८५००९०८३३) यांच्याशी संपर्क साधावा. धाराशिव, बीड जिल्हा, महामार्ग पोलिस शाखेने सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गवरील खासगी, मालवाहतूक वाहनधारकांना प्रवासादरम्यान खबरदरीचा उपाय म्हणून धोकादायक ठिकाणे सोमवारी (ता. एक) घोषित केली आहेत.

### हे आहेत 'हॉटस्पॉट'

मांजरसुंबा घाट (बीड), चौसाळा बायपास, तर धाराशिव जिल्ह्यातील पारगाव बायपास, सरमकुंडी फाटा, इंदापूर फाटा, पार्डी फाटा, तेरखेडा घुले माळजवळील उड्डाणपूल, तेरखेडा ते येडशी टोल नाका.

### चोरी-लूटमारी; दक्षता घ्या!

मागील चोरी-लूटमारीच्या घटनांवरून गुन्हेगार प्रामुख्याने लूटमार करीत असलेल्या मुद्द्यावरही लक्ष वेधण्यात आले आहे. त्यावरून प्रवास करताना दक्षता घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### नागरिकांसाठी सूचना

रस्त्यात थांबू नका, वर नमूद केलेल्या दहा धोकादायक ठिकाणी, तसेच निर्मनुष्य रस्त्यावर गाडी थांबवणे टाळावे. रात्रीच्या वेळी प्रवास करताना एकटे जाणे टाळा. शक्यतो अनेक वाहनांच्या समूहाने प्रवास करावा. वाहन चालवताना दुभाजकाला एकदम खेटून चालवू नये, कारण चोरटे झुडपांत लपलेले असू शकतात. रस्त्यात लाकूड, दगड किंवा संशयास्पद वस्तू दिसल्यास गाडी थांबवू नका, वेगात पुढे निघून जा. काहीही संशयास्पद वाटल्यास त्वरित जवळचे हॉटेल, पेट्रोल पंप येथे लोकांची वर्दळ असलेल्या ठिकाणी आश्रय घेणे.

### दृष्टिक्षेपात...

धावत्या वाहनांसमोर अचानक जॅक किंवा खिळे असलेले लाकडी ओंडके टाकून अपघात घडवणे. त्यानंतर मदत करण्याच्या बहाण्याने लुटणे.

हातात गाडीचे काही तरी साहित्य घेऊन वाहनाला मदत हवी असल्याचे दर्शवत वाहनचालकांना थांबवून शस्त्राचा धाकाने जबरी चोरी करणे.

धावत्या दुचाकीला धक्का देणे किंवा मागे बसलेल्या प्रवाशाला ओढून खाली पाडणे. तसेच पाठलाग करून 'चेन स्नॅचिंग' करणे.

रस्त्यावर जनावरे सोडून वाहनाची गती कमी होताच रस्त्याच्या बाजूला दबा धरून बसलेल्या साथीदारांमार्फत सामूहिक हल्ला करून मारहाण करीत लूट करणे.

कृत्रिम गतीरोधक तयार करणे, त्यासाठी पाइप बंडल वापरून गतिरोधक असल्याचे भासवून वाहन थांबायला भाग पाडणे आणि त्यानंतर दबा धरून बसलेल्या साथीदारांमार्फत सामूहिक हल्ला करणे.

डिझलचोरी, रात्रीच्या वेळी हॉटेल, पेट्रोल पंपावर थांबलेल्या मालवाहतूक वाहनांच्या टाकीतून डिझेल चोरी करणे.

दुभाजकामधील झाडाझुडपांत लपून बसणे, वाहनावर हल्ला करणे.

# निजामकालीन तहसील इमारत पाडून पाच महिने उलटले; काम ठप्प, चौकशीची मागणी



पाटोदा / दिव्य न्युज

पाटोदा तालुक्यातील ऐतिहासिक व निजामकालीन तहसील इमारत पाच महिन्यांपूर्वी पाडण्यात आली. मात्र त्यानंतर आजतागायत या ठिकाणी कोणतेही काम सुरू झालेले नाही. गुत्तेदाराकडून कोणतीच हालचाल न दिसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ चौकशी करून जबाबदारांवर कारवाई करावी, अशी मागणी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष राहुल भैया जाधव आणि शिवसेना उबाठा प्रमुख मुकुंद शिंदे यांनी केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जुनी तहसील इमारत व्यवस्थित स्थितीत होती. दहा-पंधरा वर्षांपूर्वी लाखो रुपयांच्या खर्चातून त्याच इमारतीत उपविभागीय अधिकारी कार्यालय सुरू करण्यात आले होते. अशा इमारतीचे अचानक पाडकाम का करण्यात आले, याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. याशिवाय कोणतेही शासकीय बांधकाम सुरू करण्यापूर्वी 'कामाचा फलक' लावणे बंधनकारक असते, परंतु या ठिकाणी कोणताही फलक न लावता थेट पाडकाम करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान पाडकामानंतर पाच महिने उलटूनही जागेवर कोणतेही काम सुरू झालेले नाही. उलट ठिकाणी आडवे पत्रे लावल्यामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. जागेवरून जाणाऱ्या वाहनांची सततची रेलचेल, उडणारा धूर व फुफाटा यामुळे पादचारी व व्यापाऱ्यांना त्रास सहन करावा लागत आहे. संबंधित प्रशासन मात्र या परिस्थितीकडे दुर्लक्ष करत असल्याची नागरिकांची तक्रार आहे. या सर्व घडामोडींचा विचार करून काम ठप्प का आहे, गुत्तेदाराला विलंबाचे संरक्षण मिळते आहे का, तसेच योग्य प्रक्रिया पाळून पाडकाम झाले की नाही, याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने चौकशी करून जबाबदारांवर कारवाई करावी, अशी मागणी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष राहुल भैया जाधव आणि शिवसेना प्रमुख मुकुंद शिंदे यांनी केली आहे.

# बीड नगर परिषद चे सफाई कामगार झाले आता गुत्तेदार!

## स्वच्छता निरीक्षक-मुकादम गायब; मुख्याधिकारी फडसे करताहेत काय?



बीड । दिव्य न्युज

बीड नगर परिषद चे सफाई कामगार आता गुत्तेदार झाल्याचा आरोप करत स्वच्छता निरीक्षक आणि मुकादम गायब असल्याने मुख्याधिकारी शैलेश फडसे करताहेत तरी काय? असा प्रश्न बीड शहरवासियांमधून उपस्थित होत असल्याचे मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी म्हटले आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, यंदा मे महिन्यापासून जोरदार पावसाळा सुरू झाला होता. तेव्हापासून ते आतापर्यंत शहरातील अनेक भागात बीड नगर परिषदेचे सफाई कामगार नाल्या काढत नाहीये. यंदा जोरदार पाऊस झाल्याने सफाई कामगारांचे काम दमदार पावसाने केले. मे महिन्यापासून ते ऑक्टोबर महिन्यापर्यंत सातत्याने पडलेल्या जोरदार पावसाने नाल्या खळाळून वाहिल्या. यामुळे सफाई कामगारांनी नाल्या काढल्या नाही. या काळात नाल्या तुंबल्याने जिथे कुठे नागरिकांचे आउटलेट तुंबले चोकअप झाले तिथे याच बीड नगर परिषदेच्या सफाई कामगारांनी खाजगी गुत्तेदारांसारखे गुत्ते घेऊन काम करून देत असल्याचे निदर्शनास आले व सध्या ही येत आहे. मात्र नोव्हेंबर महिन्यापासून पाऊस बंद होऊनही आजपर्यंत सफाई कामगारांकडून बीड शहराच्या अनेक भागातील नाल्या काढल्या जात नाहीये. पावसामुळे सहा महिने आराम केलेल्या सफाई कामगारांना आता बहुतेक काम करण्याची सवय राहिली नसल्याचे यावरून दिसून येते. त्यांची ही सवय मोडावी आणि त्यांनी पुर्ववत काम सुरू करावे याकरिता स्वच्छता निरीक्षक आणि मुकादम यांनी आपले कर्तव्य पार पाडणे अपेक्षित असताना तेही गेल्या आठ महिन्यांपासून गायब झाल्यात जमा आहेत आणि शहरातील नाल्यांसह कुंड्याविना रस्त्यांवर अस्ताव्यस्त पसरलेला कचरा शहराची शोभा वाढवीत आहे. यामुळे मुख्याधिकारी म्हणून शैलेश खडसे करताहेत तरी काय? असा प्रश्न बीड शहरवासीयांमधून उपस्थित होत असल्याचे मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी म्हटले आहे.

# ऐतिहासिक दीपमाळ खंडोबा मंदिर रस्त्यावर कचरा डेपो

## भाविकभक्त, वाटसरूनां दुर्गंधीत तोंड बांधून करावा लागतो प्रवास; नगर पालिकेने लक्ष देण्याची मागणी

बीड । दिव्य न्युज

बीड शहरातील औद्योगीक वसाहत परिसरातील डोंगरावर असलेल्या दीपमाळ खंडोबा मंदिर देवस्थानला जाणाऱ्या रस्त्याला कचऱ्याच्या ढिगाऱ्यांनी विळखा घातला आहे. ओला आणि सुका अशा स्वरूपाचा कचरा एकत्रीतपणे रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी उघड्यावर टाकला जात आहे. यामुळे सदरील रस्त्यावरून जाणारे भाविकभक्त आणि वाटसरूना तोंड बांधून दुर्गंधीतून जावे लागत आहे. बीड शहरातील स्वच्छतेचा प्रश्न सातत्याने ऐरणीवर आला आहे. शहरातील नागरीक तुंबलेल्या नाल्या आणि सार्वजनिक ठिकाणी साचलेल्या कचऱ्याच्या ढिगारातील दुर्गंधीने त्रस्त झाले आहेत. त्याच बरोबर घंटा गाड्यांव्दारे संकलीत करण्यात आलेला घरगुती कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याकडे नगर पालिका प्रशासनाने दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे संकलीत केलेल कचरा हा बिंदुसरा नदीच्या काठावर त्याच प्रमाणे औद्योगीक वसाहत परिसरात असलेल्या दिपमाळ खंडोबा मंदिर मार्गावरील रस्त्याच्या कडेला टाकला जातो. दिपमाळ खंडोबा मंदिर हे बीड शहरासह जिल्ह्यातील खंडोबा भक्तांसाठी श्रध्दास्थान आहे. त्यामुळे भाविक दररोज दर्शनासाठी मंदिरात येतात. परंतु मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावर दोन्ही बाजूने साचलेले कचऱ्याचे ढिग पाहून भक्तांच्या भावना दुखावतात. असे असतानाही नगर पालिका प्रशासन या भागात कचरा डेपो असल्याचे समजून उघड्यावर कचरा टाकीत आहे. यामुळे भाविक व नागरीकांमधून संतप्त भावना व्यक्त केली जात आहे. या प्रशासनाने सदरील ठिकाणचा डेपो हटवण्याची मागणी होत आहे.

### मोकाट जनावरे, कुत्र्यांचा होत आहे त्रास

कचऱ्यातील खाद्यपदार्थ खान्यासाठी मोकाट जनावरे आणि कुत्रे कचऱ्याचा टाकलेला ढिग उकरीत आहेत. यामुळे कचरा हा अस्ताव्यस्त पसरला जात आहे. त्यातील पॉलीथीनयुक्त व कागदी कचारा वाऱ्याने उडून परिसरातील औद्योगीक आस्थापनांमध्ये उडून जात आहे. त्याच प्रमाणे ओद्योगीक वसाहत परिसरातील रस्त्यावरही पडत आहे. या शिवाय पायी चालत जाणाऱ्या वाटसरूवर ही मोकाट कुत्रे हल्ला करीत आहेत. यामुळे सदरील रस्त्यावरून पायी प्रवास करताना कुत्र्यांच्या हल्ल्याची भीती निर्माण झाली आहे.



बीड औद्योगीक वसाहत परिसरातून दिपमाळ खंडोबा मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याच्या दोन्ही बाजूला कचरा टाकल्याने ढिग साचले आहेत.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहम्मद अबुबकर यांनी माऊली ऑफसेट एमएसईबी ऑफीससमोर माळीवेस बीड येथे छापून सां.दिव्यवार्ता कार्यालय कोहिनूर बेकरीजवळ, इस्लामपुरा रोड, बाबा चौक, भालदारपुरा बीड येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधुन व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.वाद विवाद बीड न्यायालय अंतर्गत मो.९३७१२९१०४२, ९५४५३८१२२०, फोन नंबर : ०२४४२-२३१२२०, फॅक्स नंबर : ०२४४२-२३१२२०